# खुलताबाद नगर परिषद, खुलताबाद
## जि. छत्रपती संभाजीनगर

बांधकाम विभाग

निविदा सुचना क्र. ४ - 2025-26

गिरिस्थान नगरपरिषद कार्यालय खुलताबाद * जिल्हा छत्रपती संभाजीनगर *

## फेर ई-निविदा सूचना क्र. ४ सन २०२५-२०२६

मुख्याधिकारी, गिरीस्थान नगर परिषद खुलताबाद यांच्या मार्फत वैशिष्ट्यपूर्ण योजना अंतर्गत सुयोग्य प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे खुलताबाद शहराकरिता बाग-बगीचा तयार करण्याच्या खालील कामासाठी अनुभवी व नोंदणीकृत कंत्राटदारांकडून बी-१ नमुन्यात ऑनलाईन पद्धतीने फेर ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत (रु.) | ईसार रक्कम (रु.) | ई-निविदा संचाची रक्कम (रु.) | कामाचा कालावधी | आवश्यक कंत्राटदार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नगर परिषद खुलताबाद अंतर्गत “नमो उद्यान” विकसित करणे | ८०,२४,१८३/- + जीएसटी १४४४३५३ /- | ८०,२४२/- | १,०००/- | ६ महिने | सार्वजनिक बांधकाम नोंदणीकृत |

### निविदेच्या अटी व शर्ती

१. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीद्वारे होईल. सदर निविदा नोटीस, प्रसिद्धी सूचना, आवश्यक असणारी कागदपत्रे, इत्यादीची माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

२. निविदा वेळापत्रक

| तपशील | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| निविदा प्रसिद्धी | १५-०५-२०२६ | सकाळी ११.०० वा. | | |
| निविदा फॉर्म व परिशिष्ट डाउनलोड करण्याचा कालावधी | १५-०५-२०२६ | सकाळी ११.०० वा. | २१-०५-२०२६ | सायं. ४.०० वा. |
| निविदा ऑनलाईन भरण्याचा कालावधी | १५-०५-२०२६ | सकाळी ११.०० वा. | २१-०५-२०२६ | सायं. ४.०० वा. |
| ऑनलाईन निविदा उघडण्याचा कालावधी | २२-०५-२०२६ या दिवशी सकाळी ११.०० वा. किंवा प्रशासकीय सोयीनुसार | | | |

३. निविदा फी व इसारा रक्कम (EMD) ऑनलाईन पध्दतीने भरणा मुख्याधिकारी नगर परिषद खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर यांचा नावे जमा केल्याचा पुरावा जोडणे आवश्यक अन्यथा निविदा वैध समजली जाणार नाही.
४. सदरील कामाच्या सिव्हील वर्क रकमेवर ठेकेदारांनी निविदा भरणे अपेक्षीत आहे.
५. सदरील कामासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या अधीन राहून कामाचे स्वरूप,देयक,कामाची जागा, वापरण्यात येणारे मटेरियल ई. ठेकेदारस बंधनकारक राहील.
६. सदरील कामासाठी तांत्रिक मान्यता प्राप्त अंदाजपत्रकाच्या अधीन राहून कामाचे देयक,जीएसटी,लेबर इन्शुरेंस ई. अदा करण्यात येतील.
७. सदरील कामाच्या निविदा अंदाजित किमंत शासन निर्णयाच्या अधीन राहून बदलण्याचा किंवा सदरील काम रद्द करण्याचा अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद यांना राहील.
८. निविदे मध्ये सर्वसाधारण अटी व शर्ती, तांत्रिक व आर्थिक पात्रता आणि कामाचे स्वरुप यांचा समावेश आहे.
९. उपरोक्त नमुद कामाची निविदा स्विकारणाच्या अथवा ना कारण्याचा कुठल्याही क्षणी रदद करण्याचा अधिकार मुख्याधिकारी नगरपरिषद यांनी राखुन ठेवला आहे.
१०. निविदा सूचना ही कामाच्या संविदेचा भाग असेल.
११. कार्यादेश दिल्या पासून तात्काळ काम सुरू करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.तसेच कामाच्या ठिकाणी दर्शनी स्थळावर विहित नमुन्यातील फलक लावणे ही ठेकेदारची जबाबदारी राहील.
१२. काम सुरू करणेपूर्वी व काम पूर्ण झालेनंतर कामाचे जिओ-टॅग केलेली विविध फोटो प्रति देण्याची जबाबदारी ही ठेकेदारची राहील.
१३. संबंधित निविदा धारकणे उपरोक्त नमूद कामाचे जिओ टॅग फोटोस व साइट विजिट रीपोर्ट सोबत जोडणे आवश्यक आहे.

३. इसारा रक्कम

१. इसारा रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
२. इसारा रक्कमेचा भरणा न केलेल्या निविदाकाराची प्रथम दर्शनी रद्द करण्यात येईल व त्यासाठी कोणतेही कारण विचारात घेतले जाणार नाही.
३. निवेदेची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नामंजूर निवेदा धारकांनी पावती मूळ प्रत सादर केल्या नंतर भरणा केलेली इसारा रक्कम परत करण्यात येईल.
४. ई- निवेदा सादर केल्यानंतर निवेदा धारकणे आपली निवेदा मागे घेतल्यास किंवा या बाबत तसे कळविल्यास निवेदाधारकास निवेदेबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही.
५. ज्या निवेदाधारकाची निवेदा मंजूर करण्यात येईल त्याने विहित मुदतीत सुरक्षा अनामत रक्कम भरणा न केल्यास त्याने भरलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.
६. ज्या निवेदाधारकाची निवेदा मंजूर करण्यात येईल त्याने १% इसारा रक्कम व्यतिरिक्त १% सुरक्षा अनामत भरल्या शिवाय कार्यादेश देण्यात येणार नाही.

४. निवेदा धारकाने पात्र करावयाच्या तांत्रिक अटी व शर्ती

१. नमूना अर्ज परिशिष्ट-१
२. संपर्क माहिती परिशिष्ट-२
३. कामाचा अनुभव माहिती परिशिष्ट-३
४. काळ्या यादीत टाकले नसले बाबत परिशिष्ट- ४
५. पदाधिकारी यांचा सहभाग नसलेले प्रमाणपत्र परिशिष्ट-५
६. सार्वजनिक बांधकाम विभागाचे योग्य वर्गातील नोंदणी प्रमाण पत्राची छायांकित प्रत
७. EMD व फॉर्म फी भरल्याची पावती
८. Provident fund registration certificate/EPF Code number( मागील ३ महिन्याचे चलन जोडणे आवकश्यक )
९. Goods and sevices registration/GST number
१०. आर्थिक पात्रता- मागील ५ वर्षा पैकी कोणत्याही एक वर्षाचा ITR/Turnover CA certificate ( कामाच्या किमतीच्या ७५% असणे आवकश्यक )
११. पॅनकार्ड
१२. निवेदेमधील नमूद कामसारखे काम केल्याचा सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित केलेला अनुभवाचा दाखला किंवा कार्यादेश
१३. तांत्रिक पात्रता- कामासाठी आवश्यक असणाऱ्या नमूद मशनरीचा मालकीचे कागदपत्रे व भाडे करारनामा सादर करणे बंधनकारक राहील.

ब. विशेष शर्ती

3.2.1 कामावर असलेल्या कामगारांचे नियमानुसार भविष्य निर्वाह निधी संगठन यांना देय असलेल्या रकमांची भरणा करण्याची जबाबदारी ठेकेदार यांची राहील. त्याबाबतचे इसीआर, चलन, कामागार साईट मस्टर इ.मा. आयुक्त, भविष्य निधी संगठन, छत्रपतीसंभाजीनगर यांचेकडील सादर करणे आवश्यक राहील. तसेच नगरपरिषद मागेल तेव्हा ते पुरविण्याची देखील जबाबदारी ठेकेदार यांची राहील. भविष्यात या संदर्भात काही त्रुटी निघाल्यास त्यांचे निवारण करण्याची जबाबदारी देखील मक्तेदार यांचीच राहील.

क. ई-निविदा दाखल करणेची पध्दत

3.3.1 महाराष्ट्र शासनाच्या ई-टेंडरींग पोर्टल म्हणजेच www.mahatenders.gov.in वरुन योग्य ते शुल्क भरुन ई-निविदा प्रपत्र डाऊनलोड करता येईल.

3.4.2 निविदाधारकाकडे योग्य त्यामान्यता प्राप्त संस्थेकडून प्राप्त केलेले वर्ग-2 व वर्ग-3 चे डीजीटल सिग्नीचर सर्टीफिकेट असणे आवश्यक आहे. नसल्यास इच्छुक निविदाधारक www.mahatenders.gov.in या संकेत स्थळला भेट देऊन डिजीटल सिग्नीचर मिळणे बाबतची अधिक माहिती घेऊ शकतात.

3.4.3 निविदाधारकांना www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर जावुन रजिष्टर करणे आवश्यक आहे. लॉगींग झाल्यानंतर डिजीटल सिग्नीचर रजिस्ट्रेशन आणि ई टोकन आवश्यक राहील. मान्यता प्राप्त संस्था जसे SIFY, MTNL, eMudra यांचेकडून ई टोकन प्राप्त करता येईल. नंतर निविदाधारक आपला युजर आयडी आणि TCS, nCode चा पासवर्डचा उपयोग करुन सिस्टम मध्ये लॉगींग करु शकता.

3.4.4 जे ई- टोकन नोंदणीकृत झाले आहे त्याचा वापर फक्त निविदाधारकानेच करावा, त्याचा गैरवापर होता कामा नये.

3.4.5 निविदाधारकांनी विहित मुदतीत आवश्यक ते कागदपत्र अपलोड करावे ते योग्य स्वरुपात असणे आवश्यक आहे. जसे pdf /xls / rar

3.4.6 निविदा धारकांनी नियम व अटी वाचणे आवश्यक आहे आणि त्या मान्य असल्यावरच पुढे ई-निविदा दाखल कराव्यात. किंबहुना ई निविदा भरल्यास निविदाधारकाने नियम व अटी मान्य केल्याचे मानण्यात येईल.

3.4.7 तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी वेळेच्या आधी ई निविदादाखल करणे बंधनकारक राहील. निविदादाखल झाल्यानंतर एक पोहच पावती मिळेल ती पावती निविदाधारकाने संबंधीत कामाची ई-निविदा भरली आहे. याचा पुरवा असेल.

3.4.8 खुलताबाद नगरपरिषद निविदाधारकांना ई निविदा दाखल करतांना येणाऱ्या अडचणींना आणि होणाऱ्या दिरंगाईस जबाबदार राहणार नाही.

3.4.9 सर्व कागदपत्र अपलोड झाल्यावर टेंडरींग सिस्टीम, ऑल बीड डॉक्यमेंटस अपलोड सक्सेसफुली हा संदेश देईल. त्यानंतर निविदा - धारकाला अपलोड केलेल्या कागदपत्राच्या आणि माहितीचा सारांश बघता येईल. निविदाधारकाने सर्व कागदपत्रे ई टोकनचा वापर करुन डिजीटली स्वाक्षरी करुन दाखल करावाची आहे. नंतरच ई-निविदा दाखल करता येईल.

3.4.10 अपलोड केलेली कागदपत्र (सॉफ्ट कॉपीज)व्हायरस फ्री आहे याची खात्री निविदाधारकांनी करावी. निविदा उघडण्याच्या दिवशी व्हायरसच्या प्रभावामुळे कागदपत्र वाचता आली नाही तर संबंधीत निविदा रद्द समजणेत येईल.

3.4.11 माहितीच्या सुरक्षिततेसाठी निविदा धारकांनी संपूर्ण माहिती PKI Encryption Technology ने encrypat केलेली असावी.

3.4.12 ई-निविदा पध्दतीने Secured Socket Layer 128 bit encryption technology द्वारे माहिती गोपनीयता राखली जाते.

3.4.13 निविदाधाकराने टेंडर दाखल करणे किंवा इत्यादी सर्व बाबींसाठी टेंडर सादर करावयाच्या सर्व्हरमध्ये निश्चित केलेली वेळ प्रमाण वेळ माणण्यात येईल. निविदा धारकाने सदर वेळेचे पालन करणे आवश्यक आहे. सदरची वेळ ई-निविदा भरतांना स्क्रीनच्या सर्वात वरच्या बाजुला असते.

**ब. ई-निविदा सादर करतांना निविदाधारकाने विचारात घेण्याच्या बाबी**

1. निविदाधारकाने ई-निविदा सादर करताना खुलताबाद नगरपरिषदेने निविदाधाकासाठी विहित केलेल्या अटी व शर्ती यांच्या तरतुदी विचारात घेऊन निविदासादर करावयाची आहे. त्यातील नमुद अटी शर्तीचे पालन करणे हे निविदाधारकास बंधनकारक आहे. अटी व शर्तीचे पालन न केल्यास निविदाधाकराची ई निविदा रद्द करण्यात येईल.
2. कोणत्याही अटी शर्तीच्या स्वरुपातील देकार विचारात घेण्यात येणार नाही.
3. अपूर्ण अथवा अर्धवट अस्पष्ट योग्य व्यक्तीने स्वाक्षरीत न केलेले देकार फेटाळण्यात येतील.
4. देकाराची टक्केवारी ही स्पष्ट असावी. (Estimate Rate Above or Below)
5. ई-निविदा व त्यासोबत सादर केलेली सर्व कागदपत्रे पूर्ण भरलेली व निविदाधारकाने योग्य तऱ्हेने साक्षांकीत केलेली असणे आवश्यक आहे. तसेच खाडाखोड व दुरूस्ती असलेल्या ठिकाणी निविदाधारकाने लघु स्वाक्षरी करुन ती साक्षांकीत करुन अपलोड करावी.
6. ई-निविदा बाबत कोणतेही दुरूस्ती सुचना असल्यास ती संकेतस्थळावरच कळविण्यात येईल.
7. निवदाधाकराने निविदेत किंवा निविदेसोबत सादर केलेली कोणतीही माहिती ही अपुरी, चुकीची, अस्पष्ट असल्याचे निष्पन्न झाल्यास निविदाधाकराची निविदारद्द करण्याची व त्यास अपात्र ठरविणे तसेच कराराच्या कालावधीत करार रद्द करणेचा अधिकार मुख्याधिकारी खुलताबाद नगरपरिषद यांना असेल.
8. या ई-निविदेतील अटी व्यतिरिक्त इतर कोणत्याही अटी शर्ती नमुद केलेली निविदाविचारात घेण्यात येणार नाही.
9. सदरचे कामास कमीत कमी 3 निविदा प्राप्त न झाल्यास निविदांसाठीची मुदत वाढविणेबाबत किंवा फेर निविदा बोलविणे बाबत अगर आलेले निविदांपैकी निविदामंजूर करणे बाबतचा नगरपरिषदेचा निर्णय अंतिम राहील.
10. निविदा भरण्यापुर्वी अंदाजपत्रकातील तरतुदी विचारात घेऊन निविदा भराव्यात नंतर कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
11. प्रत्येक निविदा धारकाच्या निविदासंदर्भात खुलताबाद नगरपरिषदेच्या नगरसेवकाशी प्रत्यक्ष किंवा प्रत्यक्ष संबंध असल्याचे मुख्याधिकारी यांचे मत बनल्यास सदरची निविदा मुख्याधिकाऱ्यांद्वारे रद्द करणेत येईल.

**4. ई - निविदा उघडणे**

1. ई-निविदा पध्दतीनुसार मागविण्यात आलेल्या निविदांमधून सर्व प्रथम तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र. 1 उघडण्यात येईल.
2. जे निविदाकार तांत्रिक बोली नुसार निविदेत नमुद पात्रता धारण करीत असतील अश्याच निविदाकारांच्या वित्तीय बोलीच्या लिफाफा उघडण्यात येईल.
3. निविदाकाराचे पात्रतेबाबत मुख्याधिकारी यांचा निर्णय हा अंतिम असेल व त्याबाबत निविदाकारास कोणताही वाद घालता येणार नाही.

**5. सुरक्षा अनामत**

1. ज्या निविदा धाकरांची ई-निविदा स्वीकृत करण्यात येईल त्यास नगरपरिषदेने कळविले पासुन तात्काळ ई-निविदा रक्कमेच्या1 % सुरक्षा अनामत रोखीने / डीडी द्वारे / बँकिंग प्रणालीद्वारे भरणा केली पाहिजे. त्यानंतर प्रत्येक बीलातून 8% रक्कम सुरक्षा अनामत म्हणून कपात करण्यात येईल.
2. निविदाधाकराने सुरक्षा अनामत रक्कम नगरपरिषदेत सलग जमा ठेवणे बंधनकारक राहील.
3. सुरक्षा अनामत रक्कमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.

**6. करारनामा**

अ. करारनामा

1. ज्या निविदाधाराची निविदा मंजूर करण्यात येईल त्याने त्यास नगरपरिषदेने सुचित केल्यानंतर लगेच योग्य किंमतीच्या न्यायालयीन मुद्रांकावर व कराराचे परीपूर्ण पालन करणेबाबत लेखी करारनामा मुख्याधिकारी यांचे समक्ष करुन द्यावा लागेल.
2. करारासाठीचे नियमाप्रमाणे मुद्रांक व नोंदणीशुल्क हे निविदाधाकराने अदा करावयाचे आहे.
3. सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे असेल त्यात आवश्यकतेनुसार योग्य ते बदल करणेचा अधिकार मुख्याधिकारी यांना असतील व आहेत.
4. करारनामा करणेपुर्वी नमूद केलेप्रमाणे सुरक्षा अनामत भरणा केलीची अभिकर्त्याने पुर्तता करणे आवश्यक आहे.
5. सुरक्षा अनामत भरणा करुन योग्य पध्दीने करारनामा करावा. याशिवाय कार्यादेश निर्गमित केले जाणार नाही.

**ब. करार समाप्त करणेबाबत तरतुदी**

कराराचे कालावधीत केव्हाही मुख्याधिकारी यांचे असे मत होईल की, अभिकर्ता किंवा त्यांच्या व्यवस्थापक किंवा प्रतिनिधी यांचे कामाकाज कराराच्या शर्ती अनुरूप असमाधानकारक आहे व त्याबाबत मुख्याधिकारी यांनी लेखी नोटीस दिल्यापासुन तीन दिवसाचे कालावधीत आपले कामात मुख्याधिकारी यांचे समाधान होईल अशा प्रकारे सुधारणा करुन त्यांची खात्री न पटविल्यास करारात काहीही नमुद केले असले तरी मुख्याधिकारी लेखी नोटीस देऊन ठेकेदार यांचा करार रद्द करणेची कार्यवाही करु शकेल व उर्वरीत काम इतरांकडून किंवा स्वत: किंमतीपेक्षा अधिकार असल्यास तो ठेकेदाराकडुन वसुल पात्र असेल. तसेच निविदा कालावधीत अभिकर्त्याने कोणत्याही अटी व शर्ती व शर्तीचा भंग केल्यास अभिकर्त्यास दिलेला आदेश रद्द करण्यात येईल. सुरक्षा अनामत रक्कम जप्त करेल त्यामुळे होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी ही अभिकर्त्यांची असेल.

**क. करारपूर्ण झालेनंतर किंवा रद्द केलेनंतर ताबा देणे**

कराराचा कालावधी संपल्यानंतर किंवा करार रद्द केल्यानंतर अभिकर्त्याने कामाच्या स्वरुपात नमुद केलेल्या सर्व फलक, खुणा, यासह केलेल्या कामाच्या सुव्यवस्थीत ताबा दिला पाहिजे. कामपूर्ण झाल्यास त्वरीत स्वइच्छेने नगरपरिषदेतर्फे मुख्याधिकारी हे सदर मालमत्तेचा एकतर्फी ताबा घेतील. नगरपरिषदेच्या कुठल्याही मालमत्तेचे अभिकर्त्यांकडून नुकसान झाले असल्यास ते वसुल करुन घेण्यात येईल.

**7. कामाची सुस्थिती**

1. काम पूर्ण झालेनंतर कालावधी कामा कोणतेही दोष आढळल्यास किंवा ते निकृष्ट दर्जाचे असल्याचे आढळून आल्यास, त्याची ठेकेदाराने मुख्याधिकारी यांनी आदेश दिल्यापासुन 7 दिवसांचे आत नगर परिषद अभियंता यांचे तांत्रिक मार्गदर्शनाप्रमाणे दुरूस्त करुन दिली पाहिजे.
2. तसेच जे काम मुख्याधिकारी यांचे मते दुरूस्ती करणे योग्य नसेल असे काम नव्याने करुन द्यावे लागेल व अशा दुरूस्ती किंवा नव्याने करुन दिलेल्या कामाबद्दल ठेकेदारास कोणतीही रक्कम / मोबदला / भरपाई देय नसेल.
3. वरीलप्रमाणे आदेशाचे पालन ठेकेदाराने न केल्यास त्यांचेवर करार भंगासंबंधी कायदेशीर कारवाईचा हक्क अबाधित राखुन काम नगरपरिषद मार्फत करण्यात येईल व ठेकेदार यांची सुरक्षा अनामत जप्त करण्यात येईल. दुरूस्ती / नविन बांधण्यासाठी येणारा खर्च सुरक्षा अनामतीपेक्षा अधिक असल्यास तो ठेकेदाराकडुन महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती, औद्योगिक नपगरी अधियिमांचे तरतुदीनुसार असलेली येणे रक्कम समजून त्याचे तरतुदीनुसार वसुल करणेचा नगरपरिषदेस हक्क असेल.

4. निविदेतील कामाकरिता अभिकर्त्याने कामाचे त्रयस्त पक्ष लेखापरीक्षण (Third Party Audit) व नियमित लेखा परीक्षण अहवालातील त्रुटींची पुर्तता करुन देणे बंधनकारक राहील.

8. **सर्वसाधारण अटी व शर्ती**

1. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण / सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी तांत्रिक मंजुरीकरिता घालुन दिलेल्या सर्व अटी व शर्ती निविदाकारास बंधनकारक राहतील.
2. ठेकेदारास कामाचे तपशीलाबाबत काही शंका वगैरे असल्यास त्याचा आधी खुलासा करुन घ्यावा. ठेकेदारांची कामासंबंधी अथवा अलिखित गृहित अथवा समज स्विकारण्यात येणार नाही तसेच ठेकेदाराने कोणत्याही प्रकारच्या अटी असलेली निविदा अग्राह्य समजण्यात येईल.
3. नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील स्थायी निदेश क्र. 36 नुसार नियमोचित कार्यवाही करणे बंधनकारक राहील.
4. सदरचे नगर परिषदेने मंजूर केलेल्या प्लॅन व एस्टिमेंट प्रमाणे तसेच शर्तीनुसार करावे लागेल त्याबद्दल नगर परिषद अभियंता यांनी दिलेल्या तांत्रिक सुचना अंतीम असतील.
5. ज्याच्या नावावर काम मंजुर होईल त्यास तसे कळविल्यापासुन सात दिवसांचे आत स्वखर्चाने योग्य स्टॅम्प पेपरवर करारनामा लिहून दिला पाहिजे. करारनाम्याची पुर्तता झाल्याशिवाय कामाची लाईनआऊट दिली जाणार नाही व कामही सुरू करता येणार नाही. सदरील मुदतीत करारनामा करुन न दिल्यास इसाराच्या रक्कम जप्त करण्यात येईल.
6. मुख्याधिकारी यांनी निविदा मंजुरी नंतरची इसारा रक्कम व करारनामा करुन दिल्याचे कळविल्यानंतर मुदतीत देखील जर ठेकेदार अनामत रक्कम भरत नसतील तर त्यांना सदर कामात स्वारस्य नाही असे समजून मुख्याधिकारी सदरची निविदा एकतर्फी रद्द करतील व फेनिविदा करण्यात येतील. तसेच निविदा ठेकेदार यांची जमा असेलली इसारा रक्कम जप्त करण्यात येऊन नगरपरिषद विकास कामांमध्ये मज्जाव करण्यात येईल. त्यानंतर ठेकेदार यांची कोणतीही तक्रार ऐकुण घेतली जाणार नाही.
7. कामाकरिता लागणारा कच्चा माल म्हणजे आवश्यकतेनुसार दगड, विटा, चुना, वाळु, सिमेंट अथवाप्रमाणीत साहित्य उत्तम दर्जाचे वापरे पाहिजे. निकृष्ट माल साहित्य वापरल्यास केलेले काम काढुन घेण्यात येईल व त्यांचे ऐवजी चांगला माल वापरुन अभिकर्त्यास स्वखर्चाने नविन काम करुन द्यावे लागेल निकृष्ट मालाची किंमत वेगळी मिळणार नाही.
8. मक्तेदाराने सर्व काम पी.डब्ल्यूडी रेट बुकातील / एमजीपी हॅण्ड बुकातील स्पेसिफीकेशन प्रमाणे व मुख्याधिकारी नगरपरिषद इंजिनिअर यांचे सुचनेप्रमाणे केले पाहिजे.
9. कामाचे देयक नगर परिषद शासनाकडुन वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निधीनुसार व नगरपरिषदेच्या आर्थिक क्षमतेनुसार अदा केले जाईल. याबाबत अभिकर्ता कोणतीही जबरदस्ती करणा नाही.
10. मक्तेदाराने काही काम अपूर्ण ठेवल्यास दिलेल्या तारणाची रक्कम जप्त करण्यात येईल व राहिलेली कामे मुख्याधिकारीण्यांचे मर्जीप्रमाणे डिर्पाटमेंटली अगर फेर निविदा बोलावून करुन घेणेत येतील. नफा झाल्यास त्यावर मक्तेदारास हक्क सांगता येणार नाही. पंरतू नुकसान झाल्यास ते मुळ मक्तेदाराकुन भरुन घेणेत येईल.
11. कामासाठी लागणारे मटेरियच्या रॉयल्टी व इतर शासकीय फी व्हॅट भरण्याची जबाबदारी मक्तेदारावर राहील नगरपालिकेवर नाही. रेती, खडी, दगड, वगैरेसाठी गौण खणिज परवाना रक्कम भरुन मक्तेदारानेच काढले पाहिजे.
12. अंदाजपत्रकातील प्रत्येक बाबींचे एकुण परिणाम अंदाजे आहेत. प्रत्यक्ष सांगितलेल्या बाबी पूर्ण कराव्या लागतमील व प्रत्यक्ष केलेलयाकामाचेच बील अदा केले जाईल.
13. एस्टीमेंट पेक्षा गरजेनुसार काम कमी जास्त करणेचा नगरपालिकेस अधिकार आहे. अशा जास्त केलेल्या कामाची बीले मंजूर रेटप्रमाणे देणेत येतील. अंदाजपत्रकापेक्षा निराळे काम मिळाल्यास त्याचे

कामात नमुद अंदाजपत्रकीय डीएसआर, शेड्युल रेट बील देणेत येईल. तथापी नगरपालिकेची किंवा शसानाची मंजुरीची आवश्यकता असल्यास ती मंजुरी प्राप्त  झाल्यावरच एकुण आयटेमचे पेमेंट अदा करणेत यईल.

14. कामासंबंधी अगर त्यांचे पेमेंट बाबत वाद निर्माण झाल्यास नगरपालिका जो निर्णय देईल तो अंतिम राहील व तो मक्तेदारास बंधनकारक राहील.
15. कामावर कोणतेही कामागारास काम चालु असतांना काही दु:खापत वगैरे झाल्यास त्याची नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी मक्तेदारावर राहील.
16. मक्तेदाराने कामावर लावलेल्या मजुरांची मुंबई सन 1948 चे किमान वेतन कायद्यानुसार मजुरी द्यावयास पाहिजे त्या प्रमाणे न दिल्यास त्याची जबाबदारी मक्तेदारावर राहील. नगरपालिकेवर नाही. तसेच त्यांसबंधी लेबर ऑफीसर यांनी काही माहिती मागीतल्यास ती मक्तेदाराने वेळोवेळी पुरविली पाहिजे.
17. टेंडर मंजूर केल्यानंतर भरलेल्या ईसाऱ्याची रक्कम सुरक्षा अनामत रकमेस वळती करुन घेण्यात येईल. व इतरांची इसाराची रक्कम शक्यतोवर लवकर परत करणेत येईल. कामाचे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास त्यामुदती नंतर समाधानकारक काम न झाल्यास प्रत्येक दिवसासाठी मुख्याधिकाऱ्यांचे मर्जीनुसार प्रति दिवस 1000 रुपये किंवा त्यापेक्षा जास्त दंड पेनल्टी मक्तेदाराकडुन रोख वसुल करण्यात येईल.
18. सदर काम नगरपरिषदेने मंजूर केलेल्या प्लॅन व एस्टीमेटप्रमाणे तसेच शर्तीनुसार करावे लागेल.
19. सदरचे कामास लागणारे बांधकाम साहित्य आयएसआय मार्क नामांकित कंपनीचे नगरपालिका अभियंता/ मुख्याधिकारी यांनीसुचविले नुसार वापरावे लागेल.
20. सदरील कामावर नगर पालिकेतर्फे नेमण्यात ओलल्या अधिकारी व सुपर -वायझर यांच्या देखरेख व त्यांचे सुचनेनुसार काम करावे लागेल.
21. सदरहु शर्तीत फेरबदल करणेचा नगरपरिषदेस अधिकार आहे.
22. अंदाजपत्रकातील प्रत्येक आयटमचे काम सर्वाजनिक बांधकाम विभागाने घटक साहित्य व निर्मित कामाच्या गुणवत्तेचे प्रमाणित विनिर्देश(स्टॅन्डर्ड स्पेसिफिकेशन)रेडबुक मध्ये प्रसिध्द केल्यानुसार करावे लागेल.
23. मंजुर टेंडर धारकाने कार्यादेशानुसार प्रत्येक टप्प्याची अंमलबजावणी झाल्यानंतर केलेल्या कामाची गुणवत्ता तपासण्यासाठी किंवा मोजमापे घेण्यासाठी नगरपरिषदेला लेखी कळविले पाहिजे.
24. स्थायी निदेश 36 मध्ये नमुद  केलेनुसार मंजुर ट्रेंडर धारकास कार्यादेश कामाच्या ठिकाणी जमिनीपासुन साधारण 7 फुटावर कमीत कमी 3 फुट x 2.5 या आकाराचा परिशिष्ट ब मधील नमुन्यानुसार सूचना फलक स्वखर्चाने  लावला  लागेल व तो काम पूर्ण होई पर्यंत लावलेला  राहील. याची जबाबदारी निविदा धारकाची राहील.
25. मंजुर निविदा धाकरास सदरचे कामावर वापरण्यात येणाऱ्या बांधकाम साहित्याची गुण नियंत्रण चाचणी शासनमान्य प्रयोगशाळेतून स्वखर्चाने  करुन देणे बंधनकाकर आहे. सोबत परिशिष्ट (अ) जोडलेला आहे. त्याप्रमाणे पूर्तता केलेनंतरच बिल अदा करण्यात येईल.
26. अंमलात असलेल्या कामावर कायद्यांची पुर्तता करण्याची जबाबदारी अभिकर्त्यांची असेल.
27. मक्तेदारास कामाचे प्रत्येक लेयरच्या अचुक लेव्हल्स घेणे सक्तीचे आहे. त्याची मशीनरी मक्तेदारास आणावी लागेल.
28. पर्यावरण संवर्धन कायदा 1986 व इतर पर्यावरण विषयक सर्व कायद्याचे पालन करण्याची जबाबदारी मक्तेदाराची राहील.
29. काम करतांना कोणताही अपघात झाल्यास त्याबाबतची सर्वस्वी जाबबारी मक्तेदाराची राहील.

**9. कामासाठी वापरावयाची साहित्याची तपासणी**

कामासाठी वापरावयाची तपसाणी ठेकेदारास आपल्या खर्चाने शासकीय प्रयोगशाळा / अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून करुन घ्यावयाच्या आहेत. साहित्य तपसाणी अहवाल सादर केल्याशिवाय बिल अदा करण्यात येणार नाही.

10.सुरक्षा अनामत

1. नगरपरिषदेने निश्चित केलेल्या निविदाकारांची सुरक्षा अनामत रक्कम खालील कारणास्तव कोणतेही कारण न देता जप्त करणेत येईल.
2. निविदा धारकांनी कराराचा भंग केल्यास अथवा कुठल्याही अटी व शर्तीचे पालन न केल्यास.
3. कराराप्रमाणे भरणा करावयाची रक्कम विहित वेळेत भरणा न केल्यास निविदाधारकाने कराराच्या कालावधीत करारनामा मागे घेतल्यास त्याने नगरपरिषदेत करार अंमलात येणेपूर्वी जमा केलेली बयाणा रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार नगरपरिषदेस असेल. कराराचा कालावधी संपल्यावर सहा महिन्यानंतर अभित्र्याकडेस नगरपालिकेचे कोणतही येणे नसल्यास अभिकर्त्यास सुरक्षा अनामत परत करण्यात येईल.

11. संकीर्ण

1. या करारासंबंधी कोणताही दावा न्यायालयात झाल्यास दाव्याच्या दोन्ही बाजुचा खर्च (म्हणजे नगरपरिषदेचाखर्च धरुन) अभिकर्त्यास करावा लागेल. वरील अटी व शर्तीतील एखाद्या बाबींच्या अर्थासंबंधात वाद असल्यास त्याबाबत मुख्याधिकारी नगरपरिषद जो निर्णयदेतील तोसर्व पक्षांवर बंधनकारक असेल.
2. काम सुरू करण्यापुर्वी म. मुख्याधिकारी / शहर अभियंता यांचे समक्ष काम सुरू करावे. त्याबाबत लेखी स्वरुपात अगोदरच कळविण्यात यावे.

12. कॉन्ट्रक्ट रद्द करणे

अ. जर मक्तेदाराने एखादे काम नगरपालिकेच्या दृष्टीने आपेक्षार्ह केलेले नजरेस आले किंवा मक्तेदार आर्थिक दृष्ट्या इन्सालव्हंट ठरला तर अशा परिस्थितीत कॉन्ट्रक्ट रद्द करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखुन ठेवला आहे.

ब. नगरपालिकेची लेखी पूर्व संमती न घेता जर मक्तेदार सदरचे काम दुसऱ्या कोणास सोपविले किंवा सब कॉन्ट्रक्टर दिले.

क. मक्तेदाराने जर नगरपालीकेस लेखी देऊन कळविले की,

1. मक्तेदाराने काम दुसऱ्या व्यक्तीस दिलेले आहे व सोडुन दिले आहे.
2. वर नमुद मुदतीत काम सुरू केले नाही किंवा बंद पडलेले काम 24 तासाच्या आत अगर मान्य करारनामा मध्ये नमुद केलेल्या कोणत्याही अटीचा भंग केला असे मुख्याधिकारी यांना वाटल्यास सदर कॉन्ट्रक्ट एकतर्फी रद्द करण्यात येईल व ठेकेदार यांची जमा असलेली. अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

निविदा धारकाची सही व शिक्का

श्री. समीर शेख
मुख्याधिकारी
गिरीस्थान नगर परिषद खुलताबाद

## परिशिष्ट -अ

(रु. 100 च्या मुद्रांकावर सक्षम अधिकारी यांचेकडून अभिप्रमाणीत केलेले)

मी / आम्ही याद्वारे असे नमुद करतो की, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधियिम 1965 चे कलम 16 (1) कलम 44 (ब) तरतुदीच्या ज्याखाली उदभूत केलेले आहेत. माहिती आहेत आणि गंभीरपणे नमुद करतो की, नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या संविधेमध्ये नगरपरिषदेच्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध किंवा आमच्याशी भागीदारी नाही.

**कलम 16(1) (आय)**:- यापुढे तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिकेच्या आदेशावरुन केलेल्या कोणत्याही कामात किंवा नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत जिचा स्वत:चा किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल.

**कलम** 44 (4) (ब) :- पालिका सदस्य म्हणून किंवा नगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणून ज्या कोणत्याही बाबतीत कलम 16 चे पोटकलम (3), खंड (अ),(ब), (क), (इ) व (ग) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याचा किंवा त्यांच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीने कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल - मग अशा हिश्याशी किंवा हितसंबंधाची किंमत काहीही असो, - किवा जीत त्याचा आशील्याचा प्रकल्पाच्या किंवा इतर व्यक्तीच्यावतीने व्यावसायीकदृष्ट्या त्याचा हिस्सा किंवा हितंसंबंध असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदार करील.

निविदा धारकाचे नाव ..........................
पत्ता ................................................
दिनांक :

निविदा धारकाची सही व शिक्का

साक्षीदाराचे नाव ..........................
पत्ता ................................................
दिनांक :

साक्षीदाराची सही

परिशिष्ट ब

**सुचना फलक**

खुलताबाद नगर परिषद खुलताबाद जि. छत्रपतीसंभाजीनगर

1. कामाचे नाव
2. निधीचा तपशील
3. कंत्राटाची रक्कम
4. कंत्राटदाराचे नाव
5. कार्यादेशाचा क्रमांक व दिनांक
6. काम पूर्ण करण्याचा दिनांक
7. कामातील दोष निराकरण कालावधी

Signature Not Verified

Digitally signed by RUSHIKESH PRASHANT JOSHI
Date: 2026.05.14 16:57:28 IST
Location: Maharashtra-MH